# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:23.04.2026** **वारः गुरुवार**

1. बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीसाठी आज मतदान, प्रशासकीय यंत्रणा सज्ज
2. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण, 2026 राबविण्यास मान्यता
3. गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी राज्यात अडीच लाख कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विशाल प्रकल्पांना मंजुरी आणि
4. राज्यातील विविध धरणांमध्ये सुमारे 653 पूर्णांक 63 टीएमसी पाणीसाठा, पाणी जपून वापरण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन.

**<u>पोटनिवडणूक मतदान</u>**

पुणे जिल्ह्यातील बारामती, आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी, या दोन विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. सकाळी सात वाजता मतदानाला सुरुवात झाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राहुरीचे आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागांसाठी ही पोटनिवडणूक होत आहे. बारामतीमध्ये विद्यमान उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि राहुरीमध्ये अक्षय कर्डिले हे प्रमुख उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

बारामती मतदारसंघांत एकंदर 3 लाख 84 हजार 579 मतदार असून, त्यामध्ये, 1 लाख 93 हजार 771 पुरुष आणि 1 लाख 90 हजार 684 महिला मतदारांचा समावेश आहे. या मंतदारांसाठी 478 मतदानकेंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, काल पुण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक पार पडली. आज होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर, कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात आल्याचं जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितलं.

राहुरीत 3 लाख 33 हजार 545 मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारांना सुरक्षित आणि निर्भयपणे मतदान करता यावं यासाठी सर्व, 374 मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सर्व केंद्रांवर 'वेबकास्टिंग' द्वारे थेट लक्ष ठेवलं जाणार आहे.

**<u>राज्य विधानसभा</u>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी पहिल्या टप्प्यात 152 जागांसाठी तसंच, तामिळनाडू विधानसभेच्या सर्व 234 जागांसाठी आज मतदान होणार आहे.

**<u>मंत्रीमंडळ निर्णय</u>**

'महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण, 2026' राबविण्यास काल झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या धोरणाच्या अंमलबजावणीमुळे शहरांतील कचऱ्याची विल्हेवाट पर्यावरणपूरक पध्दतीने लावणं शक्य होणार आहे. त्याचबरोबर कचरा साठविण्यामुळे निर्माण होणाऱ्या विविध समस्या, तसंच पाण्याच्या स्त्रोतांचे प्रदूषण कमी होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी 2026-27 या वर्षासाठी, 500 कोटी रुपयांची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली. तसच कॉम्प्रेस्ड बॉयोगॅसच्या, गरजेनुरूप वापरण्यायोग्य गॅस उपलब्ध होण्यासाठी, आवश्यक तंत्रज्ञान वापरून प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्यात आली. धोरणांच्या अंमलबजावणीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे.

कमाल जमीन धारणा मर्यादा नियमानुसार जमिनीचं रुपांतर भोगवटादार वर्ग 2 मधून, भोगवटादार वर्ग 1 मध्ये करण्यासाठीच्या, अधिमूल्याची पुनर्रचना करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. याबाबतची अधिसूचना काढण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

राज्यातल्या सात आदर्श महाविद्यालयातल्या शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार मूळ वेतन देण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. या पदावरच्या शिक्षकांना उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या पद भरतीमध्ये अतिरिक्त गुण मिळणार आहेत. तसंच सातारा जिल्ह्यातल्या नागेवाडी इथं आयटी पार्क उभारणीसाठी, 42 एकर जमीन देण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतला आहे.

**<u>विशाल प्रकल्प</u>**

राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करून, रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी 2 लाख 56 हजार कोटी रुपये खर्चाच्या, 18 विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यास राज्य मंत्रिमंडळानं मान्यता दिली. यामुळे सुमारे एक लाखांहून अधिक, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काल उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीची चौदावी बैठक झाली. बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योग मंत्री उदय सामंत, यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

या बैठकीमध्ये उच्च तंत्रज्ञानावर आधारित सोलर सेल, ग्रीन स्टील, हरित अमोनिया, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने, अवकाश आणि संरक्षण साहित्य, लिथियम आयन बैटरी, इलेक्ट्रीक वाहन निर्मिती या सारख्या विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन मंजूर करण्यासाठीच्या 18 प्रस्तावांना फडणवीस यांनी मान्यता दिली.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काल पायाभूत सुविधा विकास समितीची बैठकही झाली. यात मुंबई मेट्रोच्या पाचव्या मार्गिकेच्या दोन टप्प्यांना मंजुरी देण्यात आली. नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-चंद्रपूर या तीन द्रुतगती महामार्गांच्या कामांच्या, भूसंपादनासाठी लागणारं कर्ज हुडकोकडून घेण्यास तसंच, नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळयासाठी 1 हजार कोटी रूपयांच्या कामांच्या प्रस्तावालाही मान्यता देण्यात आली.

**<u>पाणीसाठा</u>**

राज्यातल्या विविध धरणांमध्ये यंदा सुमारे 654 टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती काल मंत्रीमंडळ बैठकीत देण्यात आली. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे 102 टीएमसी पाणीसाठा जास्त आहे. गेल्या वर्षी हा साठा सुमारे 552 टीएमसी होता. मात्र यंदा एल निनोच्या प्रभावामुळे, यंदा पर्जन्यमानात अनियमितता येण्याची शक्यता आहे, त्या पार्श्वभूमीवर पुढील वर्षी संभाव्य टंचाईचा मुकाबला करता यावा, यासाठी पाणी जपून वापरावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. एल-निनोच्या प्रभावामुळे 2014 मध्ये पाणीसाठ्यात 12 टक्के; तर 2015 मध्ये सुमारे 14 टक्के घट झाली होती. त्यामुळे दोन्ही वर्षी पाणीटंचाई निर्माण झाली होती.

**<u>तेजस्वी सूर्या</u>**

काँग्रेससह इंडी आघाडीनं नारी शक्ती वंदन अधिनियम आणि परिसीमन विधेयकाला विरोध करून महिलांसमवेत, महाराष्ट्रातील मतदारांच्या प्रतिनिधित्वाच्या हक्काचाही विश्वासघात केला आहे, असा आरोप भारतीय जनता युवा मोर्चाचे

राष्ट्रीय अध्यक्ष आणि खासदार तेजस्वी सूर्या यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत बोलताना केला. महिलांना राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भाजप कटिबद्ध आहे, असं ते म्हणाले.

**<u>निरसन</u>**

विद्यार्थ्यांच्या तक्रार निवारणासाठी विकसित करण्यात आलेल्या 'ई-निरसन' या अत्याधुनिक डिजिटल प्रणालीचा शुभारंभ काल उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाला. लोणेरे इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाने ही प्रणाली विकसित केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर आधारित ही प्रणाली, तक्रारींचं स्वयंचलित वर्गीकरण करून त्या संबंधित विभागाकडे तत्काळ पाठवते, तसंच विद्यार्थ्यांना तक्रारीची सद्यस्थिती ‘लाइव्ह ट्रॅकिंग’ द्वारे पाहता येते. या प्रणालीमुळे तक्रार निवारण प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि कार्यक्षम होणार असून, विद्यार्थ्यांचा वेळ आणि खर्च मोठ्या प्रमाणात वाचणार असल्याचं पाटील यावेळी म्हणाले.

**<u>वाहतूक बंद</u>**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर मुंबईकडे जाणारी वाहतूक आज दुपारी 12 ते 3 वाजेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्यात येईल. तर पुण्याकडे जाणारी वाहतूक उद्या दुपारी 12 ते 3 वाजेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. डोंगरगाव-कुसगाव इथं पुलाचं काम सुरू असल्यानं ही वाहतूक बंद राहणार आहे.

**<u>तटकरे</u>**

राज्यात अक्षय्य तृतीयेच्या दिवशी, महिला आणि बाल विकास विभागानं 'स्पेशल फोर्स'च्या माध्यमातून मोठी कारवाई केली; त्यामुळे एकाच दिवशी 32 बालविवाह रोखण्यात यश आलं आहे. महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी ही माहिती दिली.

**<u>अमराठी वाहनचालक</u>**

महाराष्ट्रात अमराठी रिक्षा, टॅक्सी आणि ॲप-आधारित वाहनचालकांसाठी प्रवाशांशी मराठीत संवाद साधणे अनिवार्य करण्याच्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनानं पावलं उचलली आहेत. या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली उद्या, 24 एप्रिल रोजी विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. वाहनचालकांना मराठी प्रशिक्षण देण्यासाठी अभ्यासक्रम तयार करण्यावर भर दिला जाणार असून या बैठकीत अंमलबजावणीची रूपरेषा ठरवली जाणार आहे. मराठी भाषेचा सन्मान राखत प्रवासी-वाहनचालक संवाद सुलभ करण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

**<u>मुक्तता</u>**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी चार संशयितांना मुंबई उच्च न्यायालयानं काल दोषमुक्त केलं आणि त्यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्याचा, विशेष न्यायालयाने दिलेला निर्णय रद्दबातल ठरवला. मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या पीठानं हा निर्णय दिला. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात या चौघांविरुद्ध आरोपपत्र करण्याचे आदेश विशेष न्यायालयानं दिले होते.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात काल संध्याकाळी पावसानं हजेरी लावली. काही ठिकाणी गारपीटही झाली. येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे, तर विदर्भात काही ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.